॥ खंड ०६ ॥
॥ ओवी नं. ०२ ॥

॥ निरसनसह मुळावरची मोठी ओवी ॥

॥ आकाश वाणी शेला ॥

जळगाव दांड चे वरचरणं :-
।। गोष्ट खरी की लटकी । तुम्ही ओळखा दादा हो ।
तुम्हा कळन तसं म्हणा । आला यवगावर राहो ।।घृ।। ..जळगाव
।। झुटी माया झुटी काया । झुटे देव तिन ।
भैसाच्या मुखचं झुट घेतलं । झाले बेईमानं ।। ..जळगाव दांड

॥ आकाशवाणी शेला घेवुन । आले श्यामकर्ण ।
२१ स्वर्ग उडुन/उरून गेला । पढंवला कोण ? ॥ घृ ॥
॥ श्यामकर्णाचे परंम् मुदतचे । घर अनामीक ।
अनामीकानं सर्वच केलं । पहा या दुनियेत ॥
॥ आपला मान मधुपान । लव, दिला कपटानं ।
प्याला दिला विष्णुला । शेला, आटोपला याहीनं ॥

डहाक्या
।। अवघ्या जीवाहुन जीव अनामीक । आंगी लहानपणं ।
अवघ्या जीवाला शरण जातो । आंगी नाही मोठेपण ।।
।। अवघ्या जीवाहुन जीव आहे । अनामीक खासा ।
यवगासाठी धावुन आला । तो माझा सखा/पिता ।।
।। चातुराई केली चातुरा । कृष्ण अवतारा ।
धरल्यां सत्य धारां । अवघे, आणले घरा ।।
।। राहु धनी राहु मुनी । तो अहिन खासा ।
सर्वत्राची खबर ठाव । तो, सांगन आता ।।
।। सर्वत्राच्या आधी आदी पुरूष, याहीचं नावं ।
तिरलोक्या मध्ये वेल त्याहीचं । न्यात ओळखावं ।।

॥ साथ छाया सात माया । उभ केलं ज्योतीनं
अमृताचे वाणं जागी केलं। सहा जनं ॥ ०४ ॥
किंवाः- ।। साथ छाया आईका गाहयां । देवं कोटीनं ।
अमृताचं वाणं जागी करा साधन ।।
॥ घडवीला पुतळा देवानं । आपल्या हातानं ।
त्या आवाजी गर्भ राहीला । त्यात नाही आपणं ॥
॥ गाई या गो-हाचं जुग/गुंज । काही कोणा समजेनां ।
निर्गुणधनी/आकाशवाणी दत्त निरंजन । केला अध्यानां ॥
॥ गाही झालीसं मात । देल्ली, भैसाच्या उदरात ।
जली मच्छींदर होवुन मासोळी । आहे जागृत ॥
॥ जलींदराच्या पोटी मच्छींदर । गेला होवुनं ।
तिच्याच पोटी आवाज दिला । डोम्या गि-हाणं ॥०८॥

॥ डोम्या आंगी पिडं पडला । अर्जुन होईना ।
याहीच्या संगती हात जोडुन । उभी राज सेना ॥
॥ आकाश वाणी, ज्योत नामाचां । साहयं, अर्जुनाशी झाला ।
चौथ्या खुम्मी अथर्वन् वेद । सैना, उभ्या राहील्या ॥
॥ या सैनाशी अमृत पान्हा । दिला देवानं ।
तो देव नाही टळला मागं । फितुरी, केली ब्रम्हयानं ॥
॥ कर्त्या-याची राज सेना माग । फिरली पलटुन ।
चौथ्या खुम्मी अथर्वन् वेद । दिला, गादीवर बसवुन ॥ १२ ॥

डहाक्या :-

॥ चतुर्पता अथर्वन् वेद सैन्य । दिले गादीवर बसुनं ।
झुटे देव सिदे गेले । राज सैन्याला शरण ॥ ०६/०२

।। चतुर्पता अथर्वन् वेद, उभा । चौथ्या खुम्मी ।
ईच्या अमृत संजीवनीचा उजाला । आहे चौताळी ।।

भजने :-

॥ अथर्वन् वेदाची मांडणी । सांगी सांगतली आकाशवाणी ॥
॥ अथर्वन् वेदाचं बोलनं । या मकाणी ठेवलं आहे सांगुन ॥
॥ अथर्वन् वेदाची गाही । जागी करन महाराजा सारी सृष्टी ॥
॥ अथर्वन् वेदाचं बोलनं । उभा राहीनं चवथा खुम्म तो चौ-यांशी मोडन ॥
॥ चौथ्या खुम्मी येईन धनी । तो तारणं जीवाजनी । हे सर्व त्याहीच्या अध्यानी.

-: निरसनसह शब्दार्थ/चरणार्थ निरसन :-

राहु :- भरून भरला आणीक उरून, राहुटी करून राहीलेला राहु । ब्रम्हांडातील परमात्मा तर पिंडीतील त्याचाच तेजोगुणी अंश अवतार घेवुन उभा असलेला आत्मा । जो राहुटी करून या प्रकृतीमायेच्या देही च्या काटेरी झोपडीत राहतो तो निरंजन आत्मा । तोच होय आदीपुरूषाची ज्योत । या आत्मज्योती मध्ये, ज्योत खेळते या भैसाची । तो भैस राजा उभा येथ । **शेंला** :- काया, देह । **झुटं** :- उष्टे । **झुटी** :- उष्टी, खोटी

।। झुटी माया झुटी काया । झुटे देव तिन ।
भैसाच्या मुखचं झुट घेतलं । झाले बेईमानं ।। जळगाव दांड चे चरणं

तो चौवेद पोटी असलेला चौथा सर्व तिरगुणी राजें यांच्या आवाक्या पासुन या तिरगुणांच्या पल्याड दुरच उभा राहुन देण देत असल्यामुळे, हे तिरगुणी राजे या चौथ्या भैसाला शरण गेलेत. आणी मायेला संग घेवुन या तिरगुणांच्या तिन राजे सह त्यांच्या मायेनं मावची कलारीन चे बाजारी रूप घेवुन पेठां मध्ये आपले विविध रूप घेवुन तिरगुणांच्या पेठां स्थापल्या. आणी तिनदेवाने कपट करून गळा हात घालुन या आदीरूप भैसाला या पेठेत आणले. आणी कारण महाकारण ग्यानाच्या प्याल्याने धुंद करून या कारण महाकारण ग्यानाची भैसाला उब आणुन त्याच्या मुखचे तिन वेद त्यांनी घेतलेत. अश्या रितीने भैसाच्या पोटामधील वेद भैसाच्या मुखातुन बाहेर काढुन ते भैसा मुखचे उष्टे/झुटे या तिन ने आपल्या पोटी घेतले असल्यामुळे उष्टेच उष्टे अवघेच उष्टे झालेत. उष्टी माया उष्टी काया उष्टे देव तिन झालेत. अधिक ग्यानाकरीता खंड01/भाग02/ओवी03 माया चैत्यन्या चे निरसन वाचावे.

ज्याने दिले त्यालाच हे तिरगुणी उष्टे देव बेईमान झालेत. ज्याच्या कडुन घेतलेत त्याच्या नावाच्या ठिकाणी आपले नाव घुसडुन टाकले. ज्याने तिन वेद दिले त्यालाच बेईमान होवुन, या तिन वेदाचा पसारा 18 पुराण, 06 शास्त्रे, स्तुती पोथी पुराण कथा गाण.. ईत्यादि मध्ये तिरगुणांचे विवरण पसरवले. आणी चौथा वेद त्या चौथ्याच्या पोटीच राहील्याकारणाने, त्या चौथ्या वेदाची फक्त प्रवेश पत्रिका देवुन उरला चौथा वेद गुप्त आहे. असे सांगत सुटलेत. सर्वसामान्य जनांला फसवुन त्यांना तिरगुणी ग्यान मधुपानाप्रमाणे पाजत त्यांच्या सहा सर्व मोठ्या मोठ्या मी-मी म्हणणा-यांनां भ्रांतीत टाकलेत. तिरगुणी ग्यानाला हाती घेवुन हे तिन वेद जेव्हा या चौथ्या आदीरूपाला शोधतात, तेव्हा ते गोंधळात पडुन नेती नेती म्हणत मागे परततात. तिन वेदांना तो चौथा काही जाणल्या गेला नाही. म्हणुनच या तिरगुणी ग्यानात असलेले तिरगुणांचे ओझे टाकुन, त्या तिरगुणांच्या पलीकडे पाहीणा-यांनाच तो चौथा शुध्द सत्व आदीपुरूष आपरूप प्राप्त होता.

अश्या रितीने या तिरगुणी माया ने या त्रिदेवांने तिनगुणांचे फासे सर्वसामान्य भक्तजनां वर टाकलेले आहेत. तिरगुणी फासे टाकुन त्यांना आपल्या तिरगुणी फास्यात अडकवुन, मधुपानाप्रमाणे ती तिरगुणी ग्यान सर्वसामान्य जनांना पाजत आहे. म्हणुनच खंड02/ओवी-7 आकाश जाणुणीया पिता व खंड02/ओवी-36 धेनुगायची ओवी या ओवीचे चरण गर्जुन सांगी करत आहे की :

।। आहो मोहीत हे पुराण । हे आहे वाचकाचे काम । 02/07
हे अवघच खोटं जाण । हा चौथा सत्यदेवच करतो तारण या सृष्टीचे ।
।। माया तिरभवनी व्याली । सर्व भुता प्रसवली ।
मुख्य वाचा खाणी चारी । वेद पुराण माया सारी ।। 02/36

ज्याच्या पासुन घेतले त्यालाच मायेसह तिनदेव बेईमान झाल्याकारणाने खोटी माया खोटी काया खोटे देव तिन ठरलेत. नका लागु तुम्ही या खोटयांच्या मागे. या झुटया तिरगुणी फासे चे खोटया मायाजाळ मुळे ते चौथ्या पर्यत पोहचु शकत नाही आहे.

॥ आकाशवाणी शेला घेवुन । आले श्यामकर्ण ।
एकविस स्वर्ग उडुन/उरून गेला । पढंवला/पाठवला कोण ? ॥

॥ श्यामकर्णाचे परंम् मुदतचे । घर अनामीक ।
अनामीकानं सर्वच केलं । पहा या दुनियेत ॥

तो आकाश वाणी चा श्यामकर्ण अनामत धनीच आता आकाशवाणी शेला घेवुन, या सत्यधारी अनामीक कृष्णाच्या देहघरच्या २१ स्वर्गावरी भरून भरला आणीक उरून उभा झालेला आहे. तो श्यामकर्ण कृष्ण देहघरी आला असल्यामुळे, आता अवघंच या अनामीक कृष्णाच्या देह घरा आले आहेत. परमं मुदतचे घर असलेला श्यामकर्ण अनामत धनी ने कृष्णा व्दारे चतुर्पती कृष्ण अवधुत पंथ मिर्तलोकी उभा करून, या पंथाच्या, या मिर्तलोकच्या भुम्मेवर नित उभा झालेला आहे. चतुर्पता कृष्ण अवधुत पंथाची पताका पुनश्चः उभारली आहे. ज्याने चतुर्पता कृष्ण अवधुत पंथ उभा केला त्यानेच या दुनियेत सर्वच केलं आहे. असे हे चरणे गर्जुन सांगी करत आहे की :

॥ आपला मान मधुपान । लव दिला कपटानं ।
प्याला दिला विष्णुला । शेला/शिल्ला आटपला याहीनं ॥

प्याला दिला विष्णुला..:-

खंड01/02/01:–शक्तीची ओवीत या चौथ्यानेच शक्तीच्या प्रार्थनेला पावुन, या तिघास जागी करून यांना तिन यवगाची राजपदवी दिली आहे. एवढच न करता जसा शनीने हनुमंतास आपल्या मानाचा प्याला दिला, तसा आपला जो मान आहे त्या मानाचा प्याला त्या चौथ्याने विष्णुला दिला आहे. आणी ज्याचा मान त्याला तर दिला नाही. परंतु आपला मान मधुपानाप्रमाणे घेवुन कपटाने प्रेम दाखवुन म्हणजेच कपटाने लव/प्रेम देवुन, कपटी माया सह या त्रिदेवांने भैसा मुखचे भैसाने पढलेले तिन वेद हाती घेतलले आहेत. हे तिन वेद त्यांनी कसे कपट करून घेतले याचे अधिक ज्ञान खंड01/भाग02/ओवी–03 माया चैत्यन्या आदीमाया ओवी मधुन घ्यावे.

या मायेसह तिन देवानें मनी कपट ठेवुन वरवर लव/प्रेम व्यक्त करत आपल्या राज्यस्थापनेसाठी चौथ्याकडे प्रार्थना मांडली. खंड०१/०२/०२ निराकार निरंजन या ओवीतुन त्यांच्या प्रार्थनेचे ग्यान घ्यावे. या प्रार्थनेला पावन होवुन त्या चौथ्याने समानता व्यवस्थेचा मानवजनावंर पसरवलेला आपला शेला आटोपता घेतला. प्रार्थनाव्दारे प्राप्त झालेल्या चौथ्याच्या देणं व्दारे त्या त्रिदेवांनी चौथ्याचा चैतन्यशिक्का असलेला त्या चौथ्याचा मानाचा शेला चा मानसन्मान कमी करत करत आटपुन सर्वसामान्यापासुन लपवुन ठेतला. अधिक ज्ञानासाठी खंड०१/०२/०२ निराकार निरंजन ओवी चे निरसन वाचावे.

सच्च्या भक्तजनांस आपणहुन येवुन देण देण्याच्या या चौथ्याच्या शिष्टाईच्या भरवश्यावर या तिघानं तिन यवगाचे राज चालवले आहे. भक्त मिळविले आहेत. ज्याच्या मुखचे घेतले त्यालाच बेईमान होवुन तिरगुणी माया सह तिरगुणांच्या तिन राजे यांनी तिन यवगात चवथ्या चतुर्पती चे ग्यानाला सर्वसामान्य भक्तजनां पासुन दुर ठेवत हे तिरगुणी राज्य स्थापले आहे. चौथ्याच्या शिष्टाईच्या भरवश्यावर भक्त मिळवुन त्या भक्तास तिरगुणी ग्यानाचा प्याला मधुपानाप्रमाणे पाजुन, या तिन यवगात त्यांनी राज केले आहेत. परंतु हे यवग चालवले कोण ? हे त्या भक्तास न कळल्यामुळे त्या भक्तांनी मुळच्या देणा-यास मान न देता भलत्यांनाच मान दिलेला आहे.

परंतु सर्वसामान्य जनांच्या दृष्टीवर टाकलेली तिरगुणी ज्ञानाची झापडी काढुन टाकण्यासाठी तो चौथा आदीपुरूष आकाशवाणी चा शेला घेवुन सत्यधारी अनामीक कृष्ण देहीवर अवतरला आहे. येथेही याहीनं येथेही लहानपण घेवुन आपला आकाशवाणी शेला आटपला आहे. असे चरणं गर्जुन सांगते की :

डहाक्या :–

।। अवघ्या जीवाहुन जीव अनामीक । आंगी आहे लहानपण ।
अवघ्या जीवाला शरण जातो । आंगी नाही मोठेपण ।।
।। अवघ्या जीवाहुन जीव आहे । अनामीक खासा ।
यवगासाठी धावुन आला । तो माझा सखा/पिता ।।
।। चातुराई केली त्वां चतुरा । कृष्ण अवतारा ।
धरल्यां सत्य धारां । अवघ, आणले घरा ।।
।। राहु धनी राहु मुनी । तो अहिन खासा ।
सर्वत्राची खबर ठाव । तो, सांगन आता ।।

या श्यामकर्ण अनामीक कृष्णाने आंगी लहानपण घेवुन चतुराई करत, सत्य धारा धरणा–या अनामीक कृष्णाने सत्य धारा वाहवत ईथे चतुर्पता पंथाच्या भुम्मेवर सर्वच काही करून ठेवले आहे. सर्व काही करत आहे. सर्वकाही करून ठेवणार आहे... हाच आदीपुरूषाचा चतुर्व्युह रंचनेत आलेला पुर्ण अवतार होय. हाच देहीच्या अर्तगत राहुटी करून वसलेला सर्व राहु चा धनी होय. याची नाही

कोणा खबर. म्हणुनच याचा तेजोगुणी अंशअवतार असलेला हा देही अंर्तगतचा राहुच आपल्या राहु धन्याच्या चतुर्पती ग्यानासह सर्वत्राची खबर ठाव सांगन हो आता ! खालील चरणे गर्जुन गाही देत, सांगी करत चतुर्पती ग्यान देत आहेत की :

।। सर्वत्राच्या आधी । आदीपुरूष, याहीचं नावं ।
तिरलोक्या मध्ये वेल याहीचा । न्यात ओळखावं ।।

सर्वत्राच्या आधी सर्वप्रथम हा एकला आदीपुरूष होता. खंड 02/11 :– 'आदीपुरूषाचा खेळ नाही कोणा मालुम' च्या निरसनातुन या चरणाचे ग्यान घ्यावे.

॥ साथ छाया सानीध्य/सात माया । उभ केलं ज्योतीनं
किंवाः- साथ छाया आईका गाहयां । देवं कोटीनं ।
अमृताचे वाणं जागी केले । सहा जनं/साधन ॥०४॥

साथ छाया :- सर्वत्राच्या आधी असलेल्या आदीरूप आदीपुरूष परमात्मा च्या निराकार निर्गुण निरंजन ज्योर्तिमय रूपाची छाया हीच प्राण शक्ती बनुन या ब्रम्हांडात त्याच्या साथ/संग ब्रम्हांडात संचारत आहे. । **आणीक माया** :- या ज्योर्तिमय परमात्माच्या मुळावरचा रंग धरून त्या ज्योतीची इच्छाच ही अद्‌भुत माया शक्तीस्वरूपात उभी झाली. या शक्तीला आवाजी तिन खुम्म दिलेत त्या चौथा तेथुन गायप झाला. त्यात नाही आपण..ईत्यादी ग्यान खंड०१/ओवी-०१ शक्तीची ओवी यातुन घ्यावे. । **सात माया** :- खंड०३/ओवी०१ः-मुळस्तंभिचा पाया या ओवीतुन मायेच्या सात रूपांचे ग्यान घ्यावे. । **वाणं** :- भेट, देणं, । **सहा जन** :- सहा नर हे सहा नर जागी करून कायेचा सहानर साचा बनवला आहे. खंड०२/ओवी-०१ सहानर सचला साचा या ओवीतुन अधिक ग्यान घ्यावे.

॥ करूनी घडवलां पुतळा । देवानं आपल्या हातानं ।
त्या आवाजी गर्भ राहीला । त्यात नाही आपणं ॥

करूनी घडवला पुतळा देवानं.. :-
एकडुन पेरते तिकडुन मोडते :-

ज्या एका ठिकाणी जेजे लिन होते, तेते त्याच एका ठिकाणापासुन प्रकट होत असते. या सुक्ष्मनियमाला अनुसरून या पिंडात या आत्म्यामध्ये प्रलय पावलेले सर्व पुन्हा त्याच आत्म्यापासुन प्रकट होते. तर ब्रम्हाडात सृष्टी प्रलयामुळे, जेजे त्या एकाच परमात्मात लिन होतात, तेते त्या एकाच परमात्मापासुनच उत्पन्न होतात. व्यक्तातुन प्रलयकाळी अव्यक्तात जातात. आणी अव्यक्तातुन व्यक्त होत राहतात त्या परमात्मा कृपेने ।

अश्या रितीने हा देव आपल्या हातानं पुतळा उभा करून त्याला घडवितो. आपल्या हातानं ईकडुन पेरतो व तिकडुन मोडत ज्योतीचा खेळ खेळत राहतो. तो असा : प्रथम देहीचा पुतळा उभा करून, त्यात त्याचे अवघ्या गोडातील गोड असलेले लावणीचे झाड म्हणजेच तेजोगुणी अंश अवतार उभा करतो. लावणीचे झाड चे ग्यान खंड०१/०२/०८ च्या निरसनातुन घ्यावे. त्या देहीला जगवत त्या देहीला घडवतो. तद्‌नंतर त्या जुन्या जिर्ण झालेल्या देहीतील ज्योत अव्यक्त करून अथवा काढुन, नव्या व्यक्त देहीत त्या ज्योतीचे विजारोपन करून खेळवत राहतो. आदीमुनी महामुनी कस नात दोघाच खंड ०२/ओवी-३० या ओवीच्या निरसन मधुन अधीक ग्यान घ्यावे.

अश्याप्रकारे हा ज्योतीचा मालक असलेला आदीपुरूप परमात्मा हाच देहीचे पुतळे करतो. देहीच्या संकष्टी त्याला बाहेर काढतो. अनुभावातुन नमुखचा उपदेश देत त्याला घडवितो. ऐसे याहीनं अनंत यवगाच्या अंती व सत् यवगाच्या आरंभिच्या संधिकाळात शक्तीला उपजुन उपदेश दिला. आवाजी बिज दिलेत. परंतु त्या आवाजी बिजा मधुन चौ-खुम्म तर उभे झाले. परंतु शक्तीच्या भ्रातीमुळे तिन खुम्म तिने जाळले आणी हा चौथा स्वतः मात्र गायप होवुन शक्तीच्या प्रार्थनेला पावुन शक्तीसमोर हा चौथा आदीमुनी रूपात उभा राहुन, शक्तीने एक शेजुन तिन ची मांडणा केलेले तिन खुम जागी करून दिलेत. शक्तीमाया चे संग ते एक शेजुन तिन खुम्म असुन हा त्यात तो चौथा नाही आहे. अधिक ग्यानाकरीता खंड०१/०१/०१ः-शक्तीच्या ओवीचे निरसन वाचावे.

॥ गाई या गो-हाचे/गर्भाचे जुग । काही कोणाला समजेना ।
निर्गुणधनी/आकाशवाणी दत्त निरंजन । केला अध्याना ॥

जुग :- यवग । **निर्गुण धनी** :- अवधुत म्हणजेच निराकार निर्गुण धनी. तोच दत्त निरंजन स्वरूपात उभा राहीला होता. तोच चौथा चतुर्पती परमात्मा चतुर्पती गायरूपात उभा झाला होता. खंड०१/भाग०२/ओवी-३ मायाचैतन्या गाईच्या ओवीतुन याचे ग्यान घ्यावे.

गाय म्हणजेच तो चौथा चतुर्पती परमात्मा. आणी त्या चौथ्याने आदीमुनी रूपात येवुन शक्तीला आवाजी दिलेले गर्भ म्हणजेच तिन खुम्म दिले. खंड०१/ओवी०१ शक्तिची ओवी मधुन अधिक ग्यान घ्यावे. त्या तिघांना तिन यवगाची राजपदवी दिली.

परंतु ही परमात्मा रूपी गाय व शक्तीचे गर्भाने म्हणजेच मायासह त्रिदेवांने चालवलेल्या या तिन जुगांत/यवगात, चौथ्या चतुर्पती निरंजन परमात्माचे ग्यान सर्वसामान्य भक्तां पासुन याहीनं दुर ठेवले. यामुळे त्याच गाईचा चौथा गर्भ असलेला चौथा भैस हा दुःखी झाला. कारण की : चौथ्याची समसमानतेची रंचना मोडण्यासाठी तसेच या तिरगुणी मायेने तिच्या त्रिपुत्रा चा राज्यकारभार चालवण्यासाठी, सर्वसामान्य भक्तजनांना तिरगुणी ज्ञान मधुपानाप्रमाणे पाजलेत. मायेने पाजलेल्या तिरगुणी ग्यानाच्या प्यालाने, सर्वसामान्य भक्त या तिनही यवगात धुंद झालेत. आणी या तिनही यवगात त्रिदेवांची माता असलेल्या या तिरगुणी मायाशक्तीने तिरगुणी ग्यानाचा फासा सर्वसामान्य भक्त जनलोकांवर टाकुन, त्यांना तिरगुणांत अडकवुन ठेवलेले असल्यामुळे, हे चतुर्पतीचे निरंजन ग्यान काही कोणा सर्वसामान्य भक्तजनांस समजेना.

या सच्च्या भक्ताने ईच्छिलेल्या विविध रूपात सच्च्या भक्ताला या चौथ्याने भेटी दिल्यात. परंतु सच्चा भक्त हा ज्या आकाराचा रूप घेवुन भैसाने भेटी दिल्या, त्या आकारी रूपालाच भजु लागलेत. परंतु त्या आकाराच्या अंर्तगत असलेला, त्या निराकार निरंजन निश्कलंकी चौथा आदीपुरूष परमात्म्याला कोणी भजत नव्हते. तिरगुणी ग्यानामुळे भक्तजनां ची दृष्टी ही आकारावरच थिजल्या गेली. त्या आकाराच्या आतमध्ये पाहण्याची अंर्तगत आत्मदृष्टी त्यांना तिरगुणी ज्ञानीजनांनी दिली नाही. या चतुर्पता गाय व मायेचे तिन गर्भ असलेले तिनदेव व चौथा गर्भ यांचे क्लिष्ट-किल्ष्ट जुगाड काही केल्या सर्वसामान्य भक्तजनां च्या ध्यानी आले नाही.

तिरगुणी मायेच्या प्याल्यामुळे या चौथ्या चतुर्पती निरंजन आदीपुरूषाचे भक्तांना विस्मरण पडुन ते भक्त फक्त आकारालाच महत्व देवु लागलेत. तिन देव व त्यांचे तिरगुणी अवतार यांच्या देहीच्या आत असलेल्या चौथ्याकडे दुर्लक्ष्य करून, त्या देहीच्या आकारालाच भजु लागल्याकारणाने ही चतुर्पता गाय खिन्न झाली. कारण की : या चतुर्पता गाईने स्वर्गावरत या चौघांना चतुर्पता ज्ञानाचा अमृत पान्हा पाजुन जगवले होते. माया चैत्यन्या आदीमाया खंड ०१/०२ ओवी ०३ मधुन ग्यान घ्यावे. या ओवीत चौथ्या भैसाने दिलेल्या वचनाप्रमाणे या चौथ्या आदीरूप भैसानेच आपल्या ईमान राखुन या चौथ्या गाईला आपल्या हद्याच्या मासंपेशी च्या रोमारोमात चतुर्पता नाम भरून या चतुर्पता ला जागा दिली होती. आणी आजही तो देत आहे. देत राहणार. याच कारणास्तव त्याने या तिघांचे राज्य चालवत चतुर्पता गाईला सच्च्या भक्तजनांच्या हद्यी जागा देत राहीला.

हे तिन यवग चालवले कोण ? सच्च्या भक्तीला देणं देणारा कोण ? चौथ्याच्या देणं देण्याच्या शिष्टाई व्दारे या त्रिदेवांनी कसे भक्त गणांचा संचय केला ?..ईत्यादी चे ग्यान तसेच त्रिदेंव व त्याचा बोलावर उभा राहणारा चौथा चतुर्पती राया यांचे जुगाड, न्यात, व चतुर्पतीचे निरंजन ग्यान काही केल्या कोणा समजेना.

निर्गुण धनी दत्त निरंजन । केला अध्याना :-

परंतु या कलयवगाच्या संधीकाळात हे चतुर्पती चे निंरंजन ग्यान सच्च्या भक्तांना देण्यासाठी कृष्णा उभा राहीला. त्याने देह धरला. आणी या देहात निर्गुण धनी दत्त निरंजनाला अंर्तभुत करून घेतले. त्या चौथ्या चतुर्पती निर्गुण निरंजन दत्त धन्याला आपल्या संपुर्ण अध्यानी केला. आपल्या देहीच्या आत त्याला अंर्तभुत करून घेतले. म्हणजेच त्या चतुर्पती परमात्मा आदीपुरूषाची पुर्ण निश्कलंकी ज्योत आपल्या

देहीच्या ज्योतीमध्ये अंर्तभुत करून, त्या ज्योतीमध्ये ज्योत खेळवत तोच आदीपुरूषाचा पुर्ण अवतार बनला.

॥ गाही झालीसे मात । देल्ली, भैसाच्या उदरात ।
जली मच्छींदर होवुन मासोळी । आहे जागृत ॥

गाही झालीसे मात :-

कलयवगात झाली मात, श्रीकृष्ण नाथ वचनी गोयला । कर्तार धनीदेव महाराजा आंगी उभा राहीला. हा सर्वेश्वर सर्व ऋषी चा ईश्वर ऋषिश्वर धनी या कृष्ण महाराजाच्या स्वराला/श्वासाला येवुन मिळाला. आणी कृष्ण नरदेहीचा याहीनं आपला पुर्ण अवतार केला. ही कृष्ण गाय झाली संपन्न । या आदीपुरूषाने दिलेल्या अनेक साक्ष पुरावे गाही व्दारे अनेक माव वर मात होवुन चौयवगाच्या सर्व गाहीवर या कलयवगाच्या संधीकाळात सावंगा येथे मात झाली आहे. भैसापोटचा अथर्वन् वेद कृष्णा मुखातुन बाहेर पडुन येथे उभा राहीला. भैसाच्या सत् यवगाची मांडणी झाली. सानीध्य बहुत काही झालेले आहे. याची खबर नाही कोणाशी !

देल्ली, भैसाच्या उदरात :-

जे मायेसह तिन यवगाचे राजे तिन ने आपल्या तिन यवगात जे चतुर्पती ग्यान झाकले होते, ते झाकण उघडुन तिग्गुणाची झापड सर्वसामान्यांच्या दृष्टिवरून काढण्याकरीता, सर्वसामान्यांचे तारण करण्याकरीता, नव्या जोमाने चौथ्या चतुर्पती धन्याचे चतुर्पती ग्यान व चतुर्पती भक्तीचे बिजे जनसामान्यासह जाणत्यात रोवण्याकरीता, त्यांच्या देहीवर ज्योता चढवण्याकरीता, भैसाच्या सत्यवगाच्या मांडणा मजबुत करण्याकरीता, सिध्द शक्तीयॉ वर ज्योता चढवण्यासाठी, कलीचा मान राखण्याकरीता...सानीध्य बहुकारणाकरीता त्या कृष्णाने गायपाचा खेळ उभारून आध्यात्मीक जलाचरात म्हणजेच पंचतत्व काल दिशा आत्मा मन या नउ द्रव्यात/जलात उडी घेवुन कृष्ण देह भैसा उदरात घातला. आणी हा निर्गुण निराकार निश्कलंकी श्रीकृष्णा या आध्यात्मीक जलातुन गुप्तपणे सावंग्यात उभा राहुन ठाई ठाई आपला अवतार खेळु लागला आहे. प्रतेक वेळी याच्या संग होती शक्ती । हा जली मच्छींदर होवुन ही अंबर चतुर्पती मासोळी आहे जागृत !

जली मच्छींदर होवुन मासोळी । आहे जागृत :-

या कृष्णरूपी जागृत मासोळीच कधी देही होतो. कधी विदेही होतो. येतो पुन्हा ! चतुर्पता अथर्वन् वेद ची चौथ्या खुम्मी करतो गर्जना । आपल्या पोटी असलेला चौथा चतुर्पता अथर्वन् वेदाची आपणहुन भक्तांच्या देहघरा येवुन सच्च्या भक्तांना हाती घेवुन दवंडी च्या प्रमाणे वाणी गर्जुन सांगीतली आहे. हा चतुर्पता अथर्वन् वेद त्या कृष्णाने सच्च्या भक्त जनांच्या हाती दिला आहे. अश्या रितीने चतुर्पता गाय उभी ठेवण्यासाठी आध्यात्मीक जलाचरातील ही मासोळी जागृत असुन याच मासोळीने कित्येक ठिकाणी ठाई ठाई अवतार धरला. हे कोणा नाही मालुम. कृष्णामृत मधुन अधिक ग्यान घ्यावे. असे त्या ठाई ठाई अवतार खेळलेल्या कृष्णा च्या पुर्णात्माने या कलयवगात जे आधीच ठरवुन ठेवले आहे, ते घडवुन उभे करण्याकरीता उदाहरणार्थः- चतुर्पता अथर्वन् वेद, भैसाच्या सत् यवगाची मांडणी...ईत्यादी, तसेच आधीच्या ही यवगात बहु कारणाकरीता आधीच आपले चतुर्पतीचे कार्य योजुन ठेवलेले आहे. याचे ग्यान व गाही खालील चरणे गर्जुन देत आहेत की :

॥ जलींदराच्या पोटी मच्छींदर । गेला होवुनं ।
ईला/तिच्या नमुखचा/पोटी आवाज दिला । डोम्या गि-हाणं ॥
॥ डोम्या आंगी पिडं पडला, अर्जुन होईना ।
याहीच्या संगती हात जोडुन । उभी राजसेना, ॥
किंवा ।। डोम्या आंगी पिंड पडला । अर्जुन होईना ।
याहीच्या संगती राज सैना । उभ्या राहील्या ।।
॥ आकाशवाणी/देहजगवाची, ज्योत नामाचां । साहयं अर्जुनाशी झाला ।
चौथ्या खुम्मी अथर्वन् वेद । सैना उभ्या राहील्या ॥
॥ या सैनाशी अमृत पान्हा । दिला देवानं ।
तो नाही टळला मागं । फितुरी, केली ब्रम्हयानं ॥

धर्म हरीश्चंद्राने केले. त्याने डोम्या घरी पाणी भरले. नित सत्या ठाई उभा राहणारा हा चतुर्पती सत्यदेव हरीश्चंद्राच्या पाठीशी नित उभा राहीला. आपल्या बोलावर उभा राहणा-या चतुर्पती ग्यानी हरीश्चंद्राच्या बोलावर उभा राहुन, या सत्यदेवानं हरिश्चंद्राच्या गेल्या वस्त्या दिल्या पुनः हरीश्चद्राच्या हाती आणुन ! या सत्यदेव चतुर्पती चौथ्यां परमात्म्याने हरीश्चंद्राची परिक्षा पाहणा-या विश्वमित्राची मान वाकडी केली हो ।

रोमरोमात सत्य धारण करून सत्य बाळगणा-या हरिश्वंद्राला पोषणारा मसानगीर डोम्या गि-हानं हरीश्चंद्राजवळचे सत्यज्ञान ग्यान घेवुन जेव्हा ठाई ठाई अवतार घेवुन खेळत असलेल्या सत्यदेवाला नमुखचा आपल्या पोटचा आवाज दिला, तेव्हा त्याच्या त्या आवाजाने सत्यदेव चतुर्पती धन्याचे वर्णन काही होईना ! डोम्या ने हरीश्चंद्राकडुन सत्यज्ञान घेतलेल्या त्याच्या आंगचा ग्यानपिंड काही पडेना.! अर्जुन वर्जुन होईना !.

परंतु त्या डोम्याने सत्याला धारण करणा-या राजाचे पोषन केलेले असल्यामुळे, त्या सत्य पोषणाच्या पुण्याच्या लाभ देण्यासाठी त्या डोम्या साठी सत्याला भजणा-या चतुर्पती सैना आपल्या सत्यदेव चतुर्पती धन्याला शरणा जावुन सत्यधारण करणा-याला पोषणा-या डोम्या च्या आंगचा हरीश्चंद्राच्या संगतीन हरीश्चंद्राने दिलेल्या सत्य ग्यानाचा ग्यानपिंड पाडुन, विर अर्जुन होवु दया ! अशी विनवणी अर्जा करू लागल्यात. या चतुर्पतीच्या चौथ्या निराकार निर्गुण सत्यदेवाच्या सत्याला धरून असलेल्या सर्व चतुर्पता अथर्वन् वेदाच्या सैन्याची विनंतीपुर्वक अर्जा धन्यानें मान्य करून डोम्या आंगचा सत्याचे पोषण करणारा ग्यानपिंड पाडला. आणी तो सत्याला पोषण करणारा ग्यानपिंड आत्मसाद करून कोणी एक कृष्णपरमात्माच्या सखात्मा विर अर्जुन झाला.

जेव्हा कृष्ण सखात्मा विर अर्जुन झाला, तेव्हा तो कृष्णाची संगत करू लागला. कृष्णाच्या संगतीने बहु लाभ होवुन सत्यदेव चतुर्पती कृष्णराज च्या सत्यधारी चतुर्पती सैना त्या अर्जुनाच्या संगतीस उभ्या राहील्यात. कर्तार धनीदेव कृष्णराज च्या सेना जिथे कुठे गुंतल्या असेल तेथुन पलटुनी येवुन अर्जुनाच्या मागे त्याच्या पाठीशी उभ्या राहील्यात. अर्जुन सह राज सैना ला अमृत पान्हा कृष्ण देवरायानं पाजला.

कृष्णाने अर्जुनास गितां अमृत पान्हा पाजुन बोध केला. कोटी कोटी चंद्र सुर्याची प्रभा फाकवुन आपले सेरूप दाखवले. कृष्णाचे सेरूप पाहुन अर्जुन मनात विस्मित झाला. अर्जुनास देह जगवाची आकाशवाणी व कृष्ण नामाची ज्योती चे अनेक साहयं झालेत. त्याच्या पोटी कृष्णा मुखचा चतुर्पता अथर्वन् वेद उभा राहीला. आणी या चौथ्या खुम्मीच्या चतुर्पता अथर्वन् वेद ग्यान ने माव करून अर्जुनाने आपल्या हातुन टाकलेला धनुष्यबाण त्याच्या हाती पुनश्चः उचलुन घेण्यास साहयं केलेत. आणी अर्जुनाने हाती घेतलेल्या त्या धनुष्यावर बाणावर बाण खेचुन कौरव आणी कौरवा सह असलेले छान्नव कुळीचे राजे उडवुन दिलेत. कौरवासह छान्नव कुळीचे राजे मारून यानं निर्गुण अश्या आत्मगादीवर आपल्या चतुर्पता अथर्वन् वेद सैन्य बसवुन दिले. हे चतुर्पता अथर्वन् सैन्य निर्गुण आत्म गादीवर बसवण्यासाठी तो कृष्णदेव त्यास साहय करण्यास कुठेही मागे राहीला नाही. तो देव नाही टळला मागे ! सत्याठाई हा देव राया उभा असे. या चतुर्पतीच्या चौथ्या निराकार निर्गुण सत्यदेवानंच सत्याला धरून असलेल्या सर्व सैन्याला चतुर्पती चे निरंजन ग्यान असलेले अमृत फल या देवाने वेळोवेळा देल्ले. यवगान यवगात तो देव नाही चुकला तिरलोक्याशी ! वेळोवेळा त्याने आपणहुन उभा राहुन हे चतुर्पतीचे निरंजन ज्ञानरस असलेले अमृत फल सच्च्या सत्य भक्तांना दिलेले आहेत.

परंतु ब्रम्हानं फितुरी करून हे अमृत फळ सर्वसामान्य लोकांपासुन दुरं ठेवले. या चतुर्पता अथर्वन् वेद चे सत्य ग्यान देण्यास मात्र ब्रम्हयांचा व्यास फितुर झाला. त्या व्यासास जेव्हा एका सच्च्या कृष्णभक्ताने विचारले की : गिता तुमची होय काय ? तुम्ही लिहीलेली गिता कुणाची होय ? असे विचारले. मग गीता कोणी केली ? असे उत्तरादाखल व्यासाने म्हणताच त्याचीच मान वाकडी झाली. मान वाकडी करून त्याने जाणले की : हे वर्म जाणणारा या सच्या कृष्णभक्तांचा कृष्ण धनी आल्यावर काढनं माझी खोड ! संदर्भ : सिध्दांतबोध अध्याय-३०

या व्यासाने आपल्या कडे आद्य गुरूपद घेवुन सर्वसामान्यास गुरूचे पाय धुवुन अमृत पिण्यास सांगीतले आहेत. या ब्रम्हयाचे पाय धुवुन सर्व जग पितीन तरी त्यात अमृत नाही हो. हे गुणी मानवा ! तुझे मस्तकी काशी सारखे तिर्थ असतांना त्या तिर्थावर जावुन तेथील तिर्थ न पीता, काय या ब्रम्हयाचे पाय धुवुन तु तिर्थ पित बसला आहे ? जरा या मस्तक ब्रम्हांडीच्या काशी तिर्थावर जा ! आणी आपल्या बुध्दिला चालना देवुन लक्ष्यात घे की : हा ब्रम्हया तर तुला आत्मज्ञानी होवु न देता तुझेया जवळच्या काशी सारख्या तिर्थस्थानावर जाण्यास तुला रोकत आहे. कारण एकदा की तु तुझया मस्तक स्थित काशी सारख्या तिर्थ स्थानी जावुन तेथील तिर्थ पिल्यावर, तु यां ब्रम्हाचे पाय धुवुन तिर्थ पिणार नाही. त्याहीला मानसन्मान देणार नाही. त्याहीच्या देहीची पुजा करणार नाही. त्यामुळे त्यां ब्रम्हया च्या देहीला मानसन्मान व पोटापाण्याची त्यां ब्रम्हयां नी केलेली व्यवस्था मोडकळीस येईल. त्यांचे पोटपाण्याची पुंजी जाईल...इत्यादी हा ब्रम्हया चांगल्या रितीने जाणतो. म्हणुनच तो स्वार्थि ब्रम्हया तुला या तिरगुणांतच घुमवत या चतुर्पतीचे निरंजन ग्यान घेवुन आत्मज्ञानी होवु देत नाही आहे. हे कितीक सांगु ? कोणी ऐकत नाही. काय उपाय करावं आता ? त्रिगुणी माया व तिचे सुत तिरगुणाचे तिन राजे यांनी फितुरी करून सर्वसामान्य भक्तजनांच्या डोळ्यावर तिरगुणांची झापड टाकली असल्यामुळे, यांना तिरगुणांच्या पल्याडचे दिसत नाही आहे. या सर्वसामान्य भक्त जनांनी तिरगुणांचे ओझे टाकुन, या तिरगुणांच्या पलीकडे उभा असलेल्या चौथ्या शुध्दसत्व भैस राजास बघावे. या तिनगुणांच्या पल्याड उभा असलेल्या चौथ्याची सांगतो गाही, चौथ्याची गाही अनुभवावी..ईत्यादी कितीक जरी सांगीतले तरी, ते तिरगुणी जगात डुबलेले भक्तगण कोणी ऐकेना. या फितुरांना सांगता सांगवत नाही. किती सांगु रे बापा ! हे फितुर तिरगुणी जग मानत नाही.

॥ कर्त्या-याची राज सेना । फिरली पलटुन
चौथ्या खुम्मी अथर्वन् वेद । दिला गादीवर बसवुन ॥

तिरगुणींने केलेल्या फितुरी मुळे कर्ता-याच्या मुखचे चतुर्पता अर्थवन् वेदाचे राज सैन्य या तिरगुणींपासुन मागे फिरवुन, ते चतुर्पता अथर्वन् वेद चे ग्यानसंपन्न सैन्य हे कर्तार भैसाने सच्च्या भक्तजनांच्या निर्गुण गादीवर बसवुन दिले आहे. म्हणजेच त्या चौथ्या भैसाने अथर्वन् वेदाचे सैन्य, या सगुण देहीच्या आत उभा असलेला चतुर्पती परमात्माचा तेजोगुणी अंशअवतार निर्गुण आत्मा यालाच गादी बनवुन, या गादीवर तो चौथा चतुर्पता अथर्वन् वेद बसवुन दिला आहे. आणी निर्गुण गादीवर बसवलेल्या या चतुर्पता अथर्वन् वेदावर तो शुध्द सत्व चौथा आदीपुरूष भैस उभा असुन तो, या तिरगुणांच्या पल्याड सच्च्या भक्तजनांस देणं देत आहे. यां धन्याच्या अमृत संजीवनी चा उजाला चौताळावर पडत आहे. चौ ताळ उजाळत आहे. या चतुर्पता अथर्वन् वेदाव्दारे या चौताळी प्राप्त झालेला चंद्रसुर्यप्रभेचा लख्ख प्रकाश हेच माझ तिर्थ होय.

॥ चतुर्पता गाय अथर्वन् वेद । हे माझ तिर्थ ।
ईच्या अमृत संजीवनीचा उजाला । आहे चौ ताळातं ॥

॥ कृष्ण महाराज धनी अवधुत ॥